<u>प्रशासकीय मान्यता</u>

जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अनुदानातून संस्थेकरिता यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : जीएमएन -२०१९/प्र.क्र.१८८/प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १३ ऑगस्ट, २०१९

वाचा :
१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८.
४) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/यंसाख /म/ जिखप्र नागपूर / शावैमरूना /२०१९ / ५०४७ , दिनांक २०.०३.२०१९ .
५) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा खनिज खनिज प्रतिष्ठान यांचे पत्र क्रमांक जिखप्र / प्र.स. आदेश क्र. ५९ / ०२२०१९, दिनांक १८.०२.२०१९
६) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : सवैशिवसं/यंसाख / प्रलंबित प्रशासकीय मान्यता -२०१८ -१९ /१०८९१/२०१९, दिनांक १५.०७.२०१९

<u>शासन निर्णय</u> :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस संदर्भाधीन दिनांक १८.०२.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर मार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीतून खालील तक्त्यात नमूद रूपये ४,१४,००,००० (अक्षरी चार कोटी, चौदा लक्ष फक्त) ची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	प्रशासकीय मान्यता एकूण किंमत
१	हाय डेफीनेशन ॲडल्ट व्हिडीओ ब्रान्कोस्कोपी विथ व्हिडीओ सिस्टीम सेटर विथ हाय लाईट सोर्स विथ ॲक्सेसरीज	१	५५,००,०००	५५,००,०००
२	अल्ट्रासोनिक फायबर व्हिडीओ ब्रान्कोस्कोप विथ अल्ट्रासाऊंड विथ अल्ट्रासोनिक प्रोसेसर	१	१,००,००,०००	१,००,००,०००
३	एन्डोब्रॉन्कीयल अल्ट्रासाऊंड (रॅडीयल प्रोब ईबस) विथ ॲक्सेसरीज)	१	१५,००,०००	१५,००,०००
४	पेडीयाट्रीक ब्रान्कोस्कोप कॉम्पॅटीबल विथ व्हिडियो सिस्टिम सेंटर ऑफ ॲडल्ट व्हिडीओ हाय डेफिनेशन ब्रान्कोस्कोप	१	२३,००,०००	२३,००,०००
५	सेमी रिजीड थोरॅकोस्कोप	१	३५,००,०००	३५,००,०००
६	एन्डोस्कोपी कॅमेरा विथ प्रोसेसर	१	३,००,०००	३,००,०००
७	क्रायोबायोप्सी युनिट फॉर ब्रॉन्कोस्कोप	१	१६,००,०००	१६,००,०००
८	इलेक्ट्रो कॉटरी मशीन फॉर ब्रॉन्कोस्कोप (ईएसजी) विथ कॉर्ड फॉर कॉटरी	१	११,००,०००	११,००,०००
९	ॲनेस्थेसिया वर्कस्टेशन	१	२०,००,०००	२०,००,०००
१०	एन्डोस्कोपी रेकॉर्डींग सॉप्टवेअर	१	६५,०००	६५,०००
११	सिओटू इनसफलेटर मशीन	१	१,००,०००	१,००,०००
१२	व्हेन्टीलेटर्स	६	१०,००,०००	६०,००,०००
१३	मल्टीपॅरा मॉनिटर	४	३,००,०००	१२,००,०००
१४	सिपीईटी (कार्डीओ पल्मोनरी एक्सरसाईज टेस्ट)	१	३५,०००	३५,०००
१५	मॉडयुलर पिएफटी लॅब	१	४०,००,०००	४०,००,०००
१६	सिक्स मिनिट वॉक टेस्ट	१	४,००,०००	४,००,०००
१७	फेनो	१	१८,००,०००	१८,००,०००
	एकूण			**४,१४,००,०००**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीच्या अधीन अंतर्गत सदर संस्थेस मंजूर असलेल्या अनुदानातून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/ प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. त्यानुषंगाने यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. उपरोक्त तक्यात नमूद केलेल्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी येणारा खर्च सदर संस्थेस जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर संस्थेमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१३१४५६३२७७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.08.13 16:26:14 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, , जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर .
७. निवडनस्ती (प्रशा-१).